# कल्पना-विलास

विवाह बंधनाने बांधल्या गेलेल्या संसारवेलीवर दिलखुलास वाऱ्याशी पानांशिवणी खेळणारी - नाजुक रसरशीत - रंग जरा वेगळा सांगणारी दोन फुले वेलीबरोबरच - उंच, स्वाली डुलत होती, ती फुले म्हणजेच कल्पनेच्या उदरातल्या तिच्या दोन सुकन्या. प्रतिभा आणि प्रतिमा - दोन सख्ख्या बहिणी. दोघींच्याही बालवयात - तू मोठी झाल्यावर कोण होणार? अशा - आईबाबांनी विचारलेल्या प्रश्नांची - गमतीजमतीची उत्तरे सहजपणे देणाऱ्या हजरजबाबी दोन बहिणी - बदामाच्या झाडाच्या पानांची अचूक संख्या किती? किंवा - झेंडू - सूर्यफुलाच्या देठामध्ये लपलेले धागे किती? ह्याची नेमकी उत्तरे सांगणे - जसे कठिण - तसेच बालपणच्या ह्या प्रश्नांची उत्तरे अनिश्चित असतात. ती टाईमपास असतात. व्यक्ति तितक्या प्रकृति - तितक्याच त्यांच्या आवडी निवडी - वेगळे विचार - वेगळे स्वभाव - वेगळी मते असणारच. ते अगदी सहाजिकच आहे.

प्रतिमा वेगळ्या स्वभावाची - तिला कलेची आवड होती - प्रतिभा वाचनप्रिय - तर त्यांची आई कल्पना कामसू स्वभावाची. पहाटेपासूनच त्यांचा दिवस उगवत कामासाठी त्या कधी कोणाची वाट बघत नसत, पण आपणहून कोणी मदतीचा हात पुढे केल्यास - तो हात दूर लोटत नसत.. त्यांनी अनेक छंदांशी मैत्री होती. एकत्र कुटुंबात फायद्या तोट्याची बेरीज वजाबाकी अचूक करणाऱ्या होत्या. कल्पनाताईंना फक्त सरळ सोपी पायवाटच दिसत होती. वाकडेवाटीला त्या कधी वळल्याच नाहीत - प्रतिभा - प्रतिमा - प्रमोद यांना आपल्यापेक्षा चांगले शिक्षण मिळावे, याकडेच त्यांचे विचार धावत होते. तिघांनीही आपापल्या क्षेत्रात - प्राविण्य मिळविले होते. नाकासमोर चालणे - चांगले बोलणे - चांगलेच बघणे. जन्मतःच लावण्याचा ठेवा घेऊन आलेली मुले कोणाला आवडत नाहीत? कोणतेच माता-पिता संस्कारांचे पुस्तक वाचून आपल्या मुलांवर खास संस्कार करीत नसतात तर कुटुंबातल्या थोरांचे - वर्तन, विचार - ध्यास सतत सदाचाराला दिले गेलेले महत्त्व - सर्वांमध्ये जे चांगले तेच टिपून घ्यायचे हेवेदावे न करण्याची स्वभाववृत्ती - घासातला घास काढून, अडल्यानडलेल्यांना मदत करायची - अशा असंख्य गोष्टीतूनच मुले - आपोआप संस्कारित होतात. उलट घरात मोठ्यांचे वादविवाद - आक्रस्ताळेपणा - चिडचिड - छोट्या गोष्टींचे मोठे मांडवल करून - आपलीच मते मुलांवर लादणे, मुलांना दहशतीत ठेवणे, ह्यागोष्टी

M T W T F S S
Page No.: 2
Date:
YOUVA

जिथे घडतात - ते आपले घर किंवा कोणाचेच घर नसते - आणि अशाच घरांत लक्ष्मी - सरस्वती, सुखाने नांदत नाहीत. परंतु सदसद्विवेकाचे वरदान - सत्संगाचे पाठ - जिथे गिरविले जातात - तिथे आरोग्याची धनसंपदा आपोआप मिळते. असेच वळण - कल्पनाताईंनी आपल्या मुलांना लावले होते. मुलांनी कोणत्याही स्पर्धेत - कोणत्याही क्षेत्रांत मिळवलेल्या - लहानशा प्राविण्याचे तोंडभर कौतुक करून - त्यांना प्रोत्साहित करणे आणि यापुढे आणखी जास्त काही मिळवण्याची संधी देणे - हेच त्यांचे ब्रीद होते. हेच खरे मुलांवर बिंबविलेले खरे संस्कार - असे त्यांना वाटायचे. अशीच मुले कुटुंबाचे कुलदीपक - कुलभूषण असतात. हळूहळू मुलींचे शिक्षणाव्यतिरिक्त - अंगचे अंगभूत - अंतर्गुण विकसित झाले होते. मित्र मैत्रिणींचा विस्तार विस्तारित होत होता. महिला मंडळामध्ये - गावातल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये - प्रतिभाच्या दर्जेदार - वजनदार - कविता वाचनाचा कार्यक्रम - आवडीने - मनापासून ऐकला जात होता. तेरो त्यापासून ते कोऱ्या कागदांच्या डायरीमध्ये उतरलेली 'प्रतिभेची प्रतिभा' त्यांच्या कपाटात टकाटक करून बसत होत्या. प्रतिभाच्या कवितांची दीपज्योत - कवितारूपात - घराघरात प्रकाशित होत होती. दुसरीकडे प्रतिमादेखील आपल्या अभिनयाची - स्पष्ट वजनदार उच्चारांची शब्दफेक - नाट्यक्षेत्रात चमकू लागली - प्रतिमाने - आपल्या बहिणीची - 'प्रतिभेची प्रतिमा' नावारूपाला तर आणलीच - तशी स्वतःची छबी - नाटकांत स्त्रियांना विशिष्ट भूमिकेत समोर ठेवू लागली. अल्पकाळातच सर्वजण त्यांना 'कलाकार' म्हणून ओळखू लागले, आपुलकीने त्यांची विचारपूस करू लागले. कल्पना-विलास नावाची वास्तू - सुसंस्कृत असली तरीसुद्धा त्या वास्तूला लक्ष्मीपेक्षा सरस्वतीचे वरदान अधिक होते. शांती - समाधान - संतोष - यांच्यासोबत 'समृद्धी' त्यांच्या पाठोपाठ अलगद येते. आता प्रतिभाच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन हाच त्या जोडप्यासमोर प्रश्न होता - आणि कवितासंग्रहाच्या प्रकाशनाचा खर्च कसा उभा करायचा - याचाच विचार त्यांच्यासमोर महत्त्वाचा प्रश्न होता. असे असे प्रश्न सुटत असतानाच - खणखणणारा देवदूतच - प्रश्नाचे उत्तर घेऊन आला. त्या देवदूताच्या सादाला - कल्पनाताई प्रतिसाद देण्यापूर्वी विनय सांगू लागला 'आत्ताऽऽ जेव्हा जेव्हा मी आणि प्रतिमा भेटलो की प्रतिमा मला तिच्या कविता वाचून दाखवायची. तिच्या कवितांचा माझ्यावर प्रभाव पडला. मी तिचा फॅन झालो आणि ठरविले, "जेव्हा तिच्या ओघवत्या लेखणीतून - दर्जेदार आशयघन - गेयपूर्ण कविता कागदाच्या रेघांवर लिखित स्वरूपात उतरतील, तेव्हा

तेव्हा तिच्या अनुपम काव्यसंग्रहाचा पूर्ण खर्च मी देईन आणि हीच माझी यावर्षीची 'भाऊबीज' असेल. अमृताहून गोड झालेला विनयचा गुंफताना कल्पनातही अवतरत झाल्याचं - परंतु चैत्र पौर्णिमेच्या लख्ख लख्ख प्रकाशात - चंद्रफुलांनी शिंपलेले 'प्रकाशकण' अंगावर झेलता-झेलता अनुभवलेल्या विशेष सुखक्षणांचे अवर्णनीय वर्णन 'विलास'ला सांगणे त्यांच्या शब्दापलीकडचे होते. त्यांचे काहीतरी बघण्यासाठी आसुसलेले डोळे आपल्या मुलांच्या जन्माच्या त्या पाळण्यावर स्थिरावले. साधी राहणी - स्वच्छ विचार - निगर्वी स्वभाव - मातापित्यांचा आदर - अंतर्मन सोहमच्या स्वरूपात उच्चारणे अशी अष्टगुणी गुणसंचयिनी पाऊले जपत जपत वावरताना करताना - मुलांचे पाळण्यातले कोवळे पाय - आज वास्तवात भक्कमपणे उभे राहताना पाहून - आठवणींच्या कोपऱ्यात जपलेले प्रेमबिंदू वाहिले. आपली तिन्ही लेकरे - चंदेरी दुनियेतल्या कोणत्याही प्रलोभनाला दूर लोटून - चारित्र्यसंपन्न राहून मानाने वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत, यापेक्षा कोणत्या मोठ्या अपेक्षा आम्ही कराव्यात? सदाफुलीच्या फुलाप्रमाणे फुलत राहिलेला संसार म्हणून 'शहरवासी' त्यांचा परिचय करून देतात. 'सुख म्हणजे नक्की काय असतं? या प्रश्नाचं नेमकं उत्तर जाणून घ्यायचं असल्यास - कोणाच्या संशोधकाच्या शोधाची जरूर नाही - फक्त 'कल्पना-विलास' या वास्तूमध्ये डोकावून बघा - उत्तर निश्चित सापडेल. 'सह - समाधान - सातत्य - साहस' हीच सुखाची गुरुकिल्ली जवळ बाळगावी.

सुधा मराठे

डावी भुसारी कॉलनी
पौड रोड.
शिवतीर्थ - कोथरूड
पुणे ४११०३८.

Mo - 9921215334.

